# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथपालांनी केलेल्या संशोधनात संशोधन पद्धतीचा वापर : एकअभ्यास

**श्री. प्रदीप तुळशीराम पाटील**
संशोधक विद्यार्थी
कबचौउमवि जळगाव
Email: ptpatil66@gmail.com
9420852096

**डॉ. तुषार एम. पाटील**
संशोधक मार्गदर्शक
कबचौउमवि जळगाव

---

**सारांश :-**

सदर संशोधन लेखात संशोधकाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथपालांनी सन २००९ -१० ते २०१८ -१९ या दहा वर्षाचा कालावधीत जे काही संशोधन केले त्यात त्यांनी कोणत्या संशोधन पद्धतीचा वापर केला या विषयी सविस्तर चर्चा या संशोधन लेखात करण्यात आला असून त्यात संशोधन पद्धतीचा वापर, संशोधन पद्धतीचा लिंग निहाय कल, वयोगट निहाय कल, क्षेत्र निहाय कल याची सविस्तर माहिती सदर संशोधन लेखात देण्यात आले आहे. सदर संशोधनात एकूण २१५ महाविद्यालयांपैकी एकूण ९२ महाविद्यालयात महाविद्यालयीन ग्रंथपाल हे पद भरलेले नव्हते व उर्वरित एकूण १२३ महाविद्यालयांपैकी एकूण ११० महाविद्यालयांनी सदर प्रश्नावली भरून पाठविली. त्याचा प्रतिसाद दर ८९.४३% इतका आहे.

**कीवर्ड** :- संशोधन पद्धती, महाविद्यालयीन ग्रंथपाल,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

**प्रस्तावना** :-

संशोधन हा इंग्रजी भाषेतील 'Research' या शब्दाचा मराठी भाषेतील पर्यायी शब्द आहे. वेब्स्टरच्या शब्दकोशानुसार "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे आणि तथ्ये यांचे पुन:पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय". जिज्ञासा किंवा ज्ञान संपादन करणे ही मानवाची एक मूलभूत प्रवृत्ती आहे त्यासाठी तो आपल्या ज्ञानेन्द्रीयाच्या उपयोग करीत असतो. एखाद्या विषयासंबंधी किंवा घटनेसंबंधी अधिकाधिक ज्ञान मिळविणे आणि त्याची अधिकाधिक कारणमीमांसा करणे म्हणजे संशोधन होय. सदर संशोधनात संशोधन करीत असतांना संशोधक वेगवेगळ्या संशोधन पद्धतींचा वापर करीत असतो. सदर संशोधनात संशोधकाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित महाविद्यालयातील महाविद्यालयीन ग्रंथपाल यांनी सन २००९ -१० ते २०१८ -१९ या १० वर्षाच्या कालावधीत केलेल्या संशोधन लेखात कोणकोणत्या संशोधन पद्धतींचा वापर केला या संदर्भात प्रश्नावली तयार करून त्याद्वारे माहिती मिळविण्यात आली. विद्यापीठात एकूण २१५ महाविद्यालयांचा समावेश आहे.

**महाविद्यालयाविषयी माहिती :-**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे जळगाव, महाराष्ट्र येथे स्थित विद्यापीठ आहे. पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ १५ ऑगस्ट १९९० रोजी मूळ पुणे विद्यापीठापासून वेगळे करून स्थापन करण्यात आले. आजमितीस यात अनुदानित व विनाअनुदानित मिळून एकूण २१५ महाविद्यालये कार्यरत आहेत. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्नित एकूण २१५ महाविद्यालये कार्यरत असून त्यात १०४ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालये, ०७ विधी महाविद्यालये, १७ अभियांत्रिकी महाविद्यालये, ३९ शिक्षणशास्त्र महाविद्यालये, ०२ शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, ०२ ललित कला

महाविद्यालये, १३ औषध निर्माणशास्त्र महाविद्यालये, ०३ वास्तुशास्त्र महाविद्यालये, ०५ समाजकार्य महाविद्यालये व २३ मान्यताप्राप्त संस्था कार्यरत आहेत. त्यामध्ये एकूण ८४ महाविद्यालये अनुदानित स्वरूपाची असून १३१ महाविद्यालये ही विनाअनुदानित स्वरुपात कार्यरत आहेत. त्यानुसार एकूण २१५ महाविद्यालयांना प्रश्नावलीचे वाटप करण्यात आले. त्यात ९२, ४२.८०% महाविद्यालयामध्ये ग्रंथपाल हे पद रिक्त होते. उरलेल्या एकूण महाविद्यालयांपैकी एकूण ११० महाविद्यालयीन ग्रंथपालांनी प्रश्नावली भरून पाठविली त्याचा प्रतिसाद दर ८९.४३% इतका आहे.

**व्याख्या :-**

लेहमन आणि म्युरी यांच्या मते, "संशोधन म्हणजे नवीन ज्ञान मिळविण्यासाठी केले जाणारे पद्धतशीर प्रयत्न होत."

जे. डब्ल्यू बेस्ट यांच्या मते, "खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याची अधिक नियमबद्ध, आकारबद्ध, सुव्यवस्थित आणि सखोल अशी प्रक्रिया आहे."

**संशोधन पध्दती:-**

**सर्वेक्षण पद्धती :-**

जेव्हा सामाजिक समस्या, घटना याविषयी तपशीलवारपणे पहाणी केली जाते तेव्हा त्याच्या उल्लेख सामाजिक सर्वेक्षण म्हणून केला जातो. एखाद्या प्रश्नाचे निदान करण्यासाठी किंवा तो सोडविण्यासाठी आधुनिक काळात सर्वेक्षण किंवा पाहणी पद्धतीचा वापर सर्रासपणे होतांना दिसतो. सर्वेक्षणामुळे समस्येच्या स्वरूपाचे संपूर्ण ज्ञान होऊ शकते. व त्यामुळेच या पद्धतीचा सामाजिक संशोधनातही मोठ्या प्रमाणावर वापर होत असलेला दिसतो. तथ्य आणि माहिती संकलनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग होतो.

**ऐतिहासिक संशोधन पद्धती :-**

ऐतिहासिक संशोधन पद्धतीमध्ये तंत्रज्ञानाचा आणि मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश आहे. ज्याद्वारे इतिहासकारांनी प्राथमिक स्रोतांचा आणि पुराव्यांच्या पुराव्यासह इतर पुराव्याचा वापर केला आहे, ज्यात संशोधनासाठी आणि नंतर भूतकाळातील लेखांच्या रूपात इतिहास लिहावे. गतकाळात घडलेल्या घटनांच्या शास्त्रीय पध्दतीने वर्तमानकाळात केलेला अभ्यास ही बाब ऐतिहासिक अभ्यास पद्धतीमध्ये अपेक्षित आहे. सामाजिक संशोधनामध्ये तथ्ये मिळविण्याच्या अनेक पद्धतीमध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती जुनी पण उपयुक्त ठरलेली पद्धती आहे.

**शास्त्रीय/वैज्ञानिक संशोधन पद्धती:-**

वैज्ञानिक पद्धत ही घटनांची तपासणी करणे, नवीन ज्ञान प्राप्त करणे किंवा पूर्वीचे ज्ञान सुधारणे आणि एकत्रित करण्याचे तंत्र आहे. वैज्ञानिक म्हणून ओळखले जाण्यासाठी, चौकशीची एक पद्धत सामान्यतः तर्कशक्तीच्या विशिष्ट तत्त्वांच्या अनुषंगाने प्रायोगिक किंवा मोजमापकारक पुराव्यावर आधारित आहे.

**व्यष्टी अध्ययन पद्धती :-**

सामाजिक संशोधनाच्या ज्या भिन्न भिन्न पद्धती आहेत. त्यापैकी एक महत्वाची म्हणजे व्यष्टी अध्ययन पद्धती ही होय. ही अध्ययन पद्धती व्यक्ती, संस्था, घटना किंवा समूह यांचा सूक्ष्म व सखोल अभ्यास करण्यासाठी वापरली गेली आहे. व्यष्टी अध्ययन पद्धतीचे उद्दिष्ट विशिष्ट व्यक्ती, गट, सामाजिक संस्था वा समुदाय यापैकी अध्ययनासाठी म्हणून जो कोणता एकक घेण्यात आला असेल, त्या एककाचा नैसर्गिक इतिहास रेखाटणे, वा त्या एककाच्या विकासाचा तपशील वा वृत्तांत व्यवस्थितपणे शब्दांकित करणे हेच असते.

**प्रायोगिक संशोधन पद्धती :-**

शैक्षणिक संशोधन ही प्रायोगिक पद्धत आहे प्रयोग आणि प्रयोगाच्या शास्त्रीय पद्धतीचा अवलंब हे वैज्ञानिक दृष्ट्या अत्याधुनिक पद्धत आहे. नियंत्रित परिस्थितीनुसार मूलभूत संबंध प्रस्थापित करणे किंवा एखाद्या विशिष्ट घटनेच्या घटना घडणाऱ्या

परिस्थितीची ओळख पटविण्यासाठी ही एक पद्धत आहे. प्रायोगिक संशोधन हे काळजीपूर्वक नियंत्रित परिस्थितीनुसार काय होईल याचे वर्णन आणि विश्लेषण आहे.

**इतर कोणतीही संशोधन पद्धती :-**

इतर संशोधन पद्धतींमध्ये खालील संशोधन पद्धतींचा समावेश होतो. त्यात तौलनिक संशोधन पद्धती व वर्णनात्मक संशोधन पद्धतींचा समावेश होतो.

**संशोधन पद्धती :-**

सदर संशोधनात संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला असून तथ्य गोळा करण्यासाठी संशोधकाने संरचित प्रश्नावली तयार करून प्रत्येक महाविद्यालयात पाठवून महाविद्यालयीन ग्रंथपालांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. सदरगोळा झालेल्या माहितीचे सायंटोमेट्रिक पद्धतीने विश्लेषण करून त्याचे सादरीकरण सारणी व आलेख स्वरुपात करण्यात आलेले आहे.


**संशोधनासाठी संशोधन पध्दतीचा वापर:-**

संशोधनासाठी आपण कोणत्या संशोधन पध्दतीचा वापर करतात यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता व त्यास एकूण सहा पर्याय दिले होते.

**सारणी क्र. १ : संशोधन पध्दतीचा वापर**

| अ.क्रं. | संशोधन पध्दतीचा वापर | प्रतिसाद | % | प्रतिसाद नाही | % |
|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वेक्षण | ८७ | ७९.०९ | २३ | २०.९१ |
| २. | ऐतिहासिक | २५ | २२.७३ | ८५ | ७७.२७ |
| ३. | वैज्ञानिक | २३ | २०.९१ | ८७ | ७९.०९ |
| ४. | व्यष्टी अध्ययन | ४७ | ४२.७३ | ६३ | ५७.२७ |
| ५. | प्रायोगिक | ३६ | ३२.७३ | ७४ | ६७.२७ |
| ६. | इतर कोणतीही संशोधन पद्धती | ०२ | १.८२ | १०८ | ९८.१८ |

**आलेख क्र. १ : संशोधन पध्दतीचा वापर**




Volume - 3 (2023)
Issue - 1 (February)
**LIBRARY SCHOLAR**
*International Peer-Reviewed Journal of Library Science*
ISSN
2583-2549

सारणी क्र. १ व आलेख क्र. १ नुसार संशोधनात कोणत्या संशोधन पध्दतीचा वापर करण्यासंदर्भातील प्रश्नास ७९.०९% प्रतिसादकर्त्यांनी सर्वेक्षण पध्दती, ४२,७३% प्रतिसादकर्त्यांनी व्यष्टी अध्ययन पध्दती, ३२.७३% प्रतिसादकर्त्यांनी प्रायोगिक संशोधन पध्दती, २२.७३% प्रतिसादकर्त्यांनी ऐतिहासिक संशोधन पध्दती, २०.९१% प्रतिसादकर्त्यांनी वैज्ञानिक पध्दती तर फक्त १.८२% प्रतिसादकर्त्यांनी इतर पध्दतीची निवड केली.

**सारणी क्र. २ : संशोधन पध्दतीचा वापर लिंगनिहाय कल**

| | | लिंगनिहाय कल | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **संशोधन पध्दतीचा वापर** | **पुरुष** | **%** | **महिला** | **%** |
| १. | सर्वेक्षण | ७५ | ६८.१८ | १२ | १०.९१ |
| २. | ऐतिहासिक | २१ | १९.०९ | ०४ | ३.६४ |
| ३. | वैज्ञानिक | १९ | १७.२७ | ०४ | ३.६४ |
| ४. | व्यष्टी अध्ययन | ४१ | ३७.२७ | ०६ | ५.४५ |
| ५. | प्रायोगिक | ३१ | २८.१८ | ०५ | ४.५५ |
| ६. | इतर कोणतीही संशोधन पध्दती | ०२ | १.८२ | ०० | ०० |

**आलेख क्र. २: संशोधन पद्धतीचा लिंगनिहाय कल**





सारणी क्र. २ व आलेख क्र. २ नुसार हे सूचित करते की, संशोधन पध्दतींच्या वापराचे लिंगनिहाय विश्लेषण दिलेले आहे. एकूण प्रतिसादकर्त्यांपैकी ६८.१८% पुरुष प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करतात. ३७.२७% व्यष्टी अध्ययन पध्दती, २८.१८% प्रायोगिक पध्दती, १९.०९% ऐतिहासिक पध्दती, १७.२७% वैज्ञानिक पध्दती, तर फक्त १.८२% पुरुष प्रतिसादकर्ते इतर कोणत्याही संशोधन पध्दतीचा वापर करतात. तर १०.९१% महिला प्रतिसाद्कर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करतात. ५.४५% व्यष्टी अध्ययन पध्दती, ४.५५% प्रायोगिक पध्दती, तर ३.६४% ऐतिहासिक व वैज्ञानिक संशोधन पध्दतीचा वापर करतात.

**सारणी क्र. ३ : संशोधन पध्दतीचा वापर वयोगटनिहाय कल**

| | | वयोगटनिहाय कल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | संशोधन पध्दतीचा वापर | २३-३० | % | ३१-४० | % | ४१-५० | % | ५१-६० | % |
| १. | सर्वेक्षण | ०२ | १.८२ | २९ | २६.३६ | ३५ | ३१.८२ | २१ | १९.०९ |
| २. | ऐतिहासिक | ०० | ०० | ०७ | ६.३६ | ०६ | ५.४५ | १२ | १०.९१ |
| ३. | वैज्ञानिक | ०० | ०० | ०६ | ५.४५ | ०७ | ६.३६ | १० | ९.०९ |
| ४. | व्यष्टी अध्ययन | ०० | ०० | १९ | १७.२७ | १७ | १५.४५ | ११ | १० |
| ५. | प्रायोगिक | ०१ | ०.९१ | ०६ | ५.४५ | १४ | १२.७३ | १५ | १३.६४ |
| ६. | इतर कोणतीही संशोधन पध्दती | ०० | ०० | ०२ | १.८२ | ०० | ०० | ०० | ०० |

**आलेख क्र. ३: संशोधन पद्धतीचा वयोगटनिहाय कल**





सारणी क्र. ३ व आलेख क्र. ३, हे सूचित करते की, संशोधन पध्दतींच्या वापराचे वयोगटानुसार विश्लेषण दिलेले आहे. २४-३० वयोगटातील एकूण प्रतिसादकर्त्यांपैकी १.८२% प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण या संशोधन पध्दतीचा वापर करतात, ०.९१% प्रतिसादकर्ते संशोधनासाठी प्रायोगिक या संशोधन पध्दतीचा वापर करतात. ३१-४० वयोगटातील २६.३६% प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण या संशोधन पध्दतीचा वापर करतात, १७.२७% व्यष्टी अध्ययन पध्दती, ६.३६% ऐतिहासिक पध्दती, ५.४५% वैज्ञानिक व प्रायोगिक पध्दती, १.८२% इतर कोणतीही संशोधन पध्दती हा आहे. ४१-५० वयोगटातील ३१.८२% प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण या संशोधन पध्दतीचा वापर करतात, १५.४५% व्यष्टी अध्ययन पध्दती, १२.७३% प्रायोगिक पध्दती, ६.३६% वैज्ञानिक पध्दती, ५.४५% ऐतिहासिक संशोधन पध्दती हा आहे. ५१-६० वयोगटातील एकूण प्रतिसादकर्त्यांपैकी १९.०९% प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण या संशोधन पध्दतीचा वापर करतात, १३.६४% प्रायोगिक पध्दती, १०.९१% ऐतिहासिक पध्दती, १०% व्यष्टी अध्ययन पध्दती, ९.०९% वैज्ञानिक पध्दतीचा वापर करतात.

**सारणी क्र. ४ : संशोधन पध्दतीचा वापर क्षेत्रनिहाय कल**

| | | क्षेत्रनिहाय सहभाग | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | संशोधन पध्दतीचा वापर | शहरी | % | ग्रामीण | % |
| १. | सर्वेक्षण | ५९ | ५३.६४ | २८ | २५.४५ |
| २. | ऐतिहासिक | १३ | ११.८२ | १२ | १०.९१ |
| ३. | वैज्ञानिक | १३ | ११.८२ | १० | ९.०९ |
| ४. | व्यष्टी अध्ययन | ३० | २७.२७ | १७ | १५.४५ |
| ५. | प्रायोगिक | २६ | २३.६४ | १० | ९.०९ |
| ६. | इतर कोणतीही संशोधन पध्दती | ०२ | १.८२ | ०० | ०० |

**आलेख क्र. ४ : संशोधन पध्दतीचा वापर क्षेत्रनिहाय कल**




सारणी क्र. ४वआलेखक्रं.४ हे सूचित करते की, संशोधन पध्दतींच्या वापराचे क्षेत्रनिहाय विश्लेषण दिलेले एकूण प्रतिसादकर्त्यांपैकी ५३.६४% शहरी प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करतात. २७.२७% व्यष्टी अध्ययन पध्दती, २३.६४% प्रायोगिक संशोधन पध्दती, ११.८२% प्रतिसादकर्ते संशोधनासाठी ऐतिहासिक व वैज्ञानिक पध्दतींचा वापर करतात, तर १.८२% इतर कोणत्याही संशोधन पध्दतीचा वापर करतात. एकूण ३०% ग्रामीण प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करतात. १५.४५% व्यष्टी अध्ययन पध्दती, १०.९१% ऐतिहासिक संशोधन पध्दती, ९.०९% प्रतिसादकर्ते संशोधनासाठी प्रायोगिक व वैज्ञानिक पध्दतींचा वापर करतात.

**निष्कर्ष :-**

- यावरून असे आढळते की सर्वात जास्त प्रतिसाद्कर्ते हे संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर करतात.
- सर्वाधिक पुरूष व महिला प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करतात तसेच पुरुष प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वात कमी इतर कोणतीही संशोधन पध्दतीचा वापर करीत असून महिला प्रतिसादकर्ते सर्वात कमी ऐतिहासिक व वैज्ञानिक पध्दतीचा वापर करीत आहे.

- सर्व वयोगटातील सर्वाधिक प्रतिसादकर्ते सर्वेक्षण या संशोधन पध्दतींचा वापर करतात, तर सर्वात कमी इतर कोणतीही संशोधन पध्दतीचा वापर करतात.
- शहरी व ग्रामीण सर्वाधिक प्रतिसादकर्ते संशोधनासाठी सर्वेक्षण या पध्दतीचा वापर करतात, तर सर्वात कमी इतर कोणतीही संशोधन पध्दतीचा वापर करीत आहेत.

**संदर्भसूची**

१. आगलावे, प्रदीप (२०००), 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', नागपूर: विद्या प्रकाशन.
२. क-हाडे, बी.एम. (२००९), 'सामाजिक संशोधन पद्धती", नागपूर: पिंपळापुरे प्रकाशन.
३. कायंदे-पाटील, गंगाधर वि. (२००५), 'संशोधन पद्धती', नाशिक: चैतन्य प्रकाशन.
४. खैरनार, दिलीप (२००९), 'प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी', पुणे: डायमंड पब्लिकेशन.
५. गजेंद्रगडकर, व्ही.एन. (२०००), 'राजकीय समाजशास्त्रीय संशोधन', डोंबिवली: प्रतिभा प्रकाशन.
६. घाटोळे, रा.ना. (२००९), 'समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती', नागपूर: मंगेश प्रकाशन.
७. देशमुख, राम (२००५), 'मूलभूत सांख्यिकी', नागपूर: विद्या प्रकाशन.
८. देशमुख, राम (२००६), 'सांख्यिकीय पद्धती', नागपूर: विद्या प्रकाशन.
९. नागतोडे, गुरुनाथ (१९९९), 'सामाजिक संशोधन पद्धती', कोल्हापूर: फडके प्रकाशन.
१०. निकोसे, सत्यप्रकाश (२००७), 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती', नागपूर: प्रज्ञा प्रकाशन.
११. पाटील, गीता (१९९८), 'शैक्षणिक संख्याशास्त्र', नागपूर: श्री मंगेश प्रकाशन.
१२. पाटील, वा.भा. (१९९८), 'संशोधन पद्धती', नागपूर: मंगेश प्रकाशन.
१३. बोधनकर, सुधीर & अलोणी, विवेक (१९९३), 'सामाजिक संशोधन पद्धती', नागपूर: श्रीसाईनाथ प्रकाशन.
१४. भांडारकर, पु.ल. (१९८७), 'सामाजिक संशोधन पद्धती', नागपूर: महाराष्ट्र विद्यार्थी ग्रंथनिर्मिती मंडळ.
१५. मायी, सुनील (२००८), 'सामाजिक संशोधन पद्धती', पुणे: डायमंड पब्लिकेशन.